# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि., मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, वडाळा, पी. बी. नं. ७१२०, मुंबई - ४०० ०३१.

# ४२ वा



# वार्षिक अहवाल

## २०२०-२१

राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था

# मनोगत

## नागरी सहकारी बँकांचे सक्षमीकरण – तज्ञ समितीचा अहवाल

**सभासद बंधू-भगिनींनो,**



रिझर्व्ह बँकेने नुकत्याच बँकिंग नियमन कायदा -१९४९ मध्ये झालेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने नागरी सहकारी बँकिंग क्षेत्र सक्षम करण्यासाठी तसेच या क्षेत्राशी निगडीत समस्यांचा अभ्यास करण्यासाठी श्री. एन.एस.विश्वनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीची स्थापना केली आहे. या समितीने सुमारे १७५ पानांचा अहवाल प्रसिद्ध केला असून त्यावर जनतेकडून तथा बँकांकडून प्रतिक्रिया मागविल्या आहेत.

या निमित्ताने नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील प्रत्येकाला मी असे आवाहन करतो की, तज्ञ समितीच्या अहवालाचे अत्यंत काळजी-पूर्वक वाचन प्रत्येकाने केले पाहिजे. तसेच आपल्या प्रतिक्रीया रोख-ठोकपणे कळविणे अत्यंत आवश्यक आहे. या अहवालातील Vision वाचले तर त्यामध्ये नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील लहान बँकांचे एकत्रीकरण व मोठया बँकांचे व्यापारी बँकेत रुपांतर हाच रिझर्व्ह बँकेचा उद्देश दिसून येतो. याबद्दल आपले नेमके मत काय? हे रिझर्व्ह बँकेस ताबडतोब कळवावे.

माझ्या मते तज्ञ समितीच्या अहवालावर आपली प्रतिक्रिया देताना पुढील गोष्टींचा आपण जास्त विचार करावा.

१) सध्या सहकार क्षेत्रामध्ये असलेल्या प्रत्येक बँकेचे अस्तित्व कायम रहावे अथवा लहान बँकांच्या एकत्रीकरणाद्वारे त्यांचे सक्षमीकरण व्हावे या मुद्दयांवर आपले मत व्यक्त करत असताना मोठया बँकांचे रुपांतर व्यापारी बँकेमध्ये होऊ नये, या मुद्दयावर आपण ठाम असावे.

२) सहकाराच्या तत्वांचा मूळ गाभा तसाच ठेवत व्यावसायिकतेला महत्व देत असताना त्यादृष्टीने सुचविलेल्या उपाययोजनेस पाठिंबा द्यावा.

३) Risk Based Premium च्या संकल्पनेस कडाडून विरोध करावा.

४) सक्तीच्या विलीनीकरणास कडाडून विरोध करावा.

५) सध्या उच्च न्यायालयांनी दिलेल्या अनेक निकालांच्या अनुषंगाने लोकशाही नियंत्रण या तत्वाच्या विरुध्द रिझर्व्ह बँकेने सुचविलेल्या संचालक मंडळातील प्रत्येक हस्तक्षेपास विरोध करावा.

६) रिझर्व्ह बँकेने शिफारस केलेल्या Umbrella Organization ही वित्तीय संस्था खाजगी बँकेच्या स्वरुपात न ठेवता ती सहकारी तत्वावर चालविण्याचा आग्रह धरावा, तरच अशा संस्थेच्या सभासदत्वासंबंधी रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना सक्ती करणे योग्य ठरेल.

७) भांडवल उभारणीसंबंधी तज्ञ समितीने सुचविलेल्या विविध उपायांवर सारासार विचार करुन मतप्रदर्शन करावे.

८) अशा प्रकारे तज्ञ समितीचे अहवालावर मतप्रदर्शन करत असताना कुशल कर्मचाऱ्यांची गरज, आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक करणे इत्यादींसाठी शिफारशी महत्वाच्या वाटतात.

आपल्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँकेने आपल्या धोरणांमध्ये आवश्यक ते बदल न केल्यास न्यायालयीन लढा उभारणीची मानसिकता ठेवणे आजच्या स्थितीत मला गरजेचे वाटते.

आपण सुज्ञ आहात, अभ्यासक आहात, सहकार क्षेत्राचे खंदे समर्थक आहात यामुळे सहकार क्षेत्राच्या अस्तित्वाबरोबर त्याच्या सक्षमतेचाही विचार करुन तज्ञ समितीच्या अहवालावर योग्य ती प्रतिक्रिया रिझर्व्ह बँकेला देण्याचे मी आपणास नम्रपणे आवाहन करतो, कारण जेवढया जास्त प्रतिक्रिया रिझर्व्ह बँकेपर्यंत पोहोचतील तेवढया त्यांना तज्ञ समितीच्या प्रत्येक शिफारशीवर विचार करण्यास आपण भाग पाडू शकतो, अशी माझी धारणा आहे.

जय हिंद...जय महाराष्ट्र...जय सहकार


**विद्याधर अनास्कर**
अध्यक्ष
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी क्र.: २४१३५७९७,२४१५११८५ • E-mail: admin@mucbf.com • web: www.mucbf.com


## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **२९ सप्टेंबर, २०२१** रोजी **दुपारी १२:३० वाजता** सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सींग/इतर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स द्वारे 'भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१' येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.

२. दि. २४ मार्च, २०२१ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा. अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०२०-२१ सालचा वार्षिक अहवाल, ३१ मार्च, २०२१ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०२०-२१ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२१ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.

५. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६. फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता अंतर्गत लेखापरिक्षक आणि शासन मान्यताप्राप्त लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक :०७/०९/२०२१
ठिकाण : वडाळा, मुंबई-३१

**सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव

टिप : १) किमान गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेनंतर (दुपारी २:०० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.

३) सदर सभेत मास्क वापरणे, तसेच सुरक्षित अंतर पाळणेही बंधनकारक आहे.

४) आर्थिक वर्ष २०२०-२१ चा वैधानिक लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण केलेला अहवाल, दोषदुरुस्ती अहवालासहीत फेडरेशनच्या वेबसाईटवर तसेच प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

# अध्यक्षीय भाषण

**फेडरेशनच्या सर्व नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्सचे सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो!**

**प्रथमत:** दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशनच्या २०२०-२१ सालच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्च्या सन्माननीय प्रतिनिधींचे मा.संचालक मंडळाच्यावतीने मी हार्दिक स्वागत करतो.

फेडरेशनचा सन २०२०-२१ चा ४२ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले फेडरेशनचे दि. ३१ मार्च,२०२१ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल, त्यावर कार्यालयाने तयार केलेला दोषदुरुस्ती अहवाल, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचे अंदाज पत्रक तसेच नागरी सहकारी बँकांसंदर्भात नियामकांनी जारी केलेल्या ध्येय धोरणांची माहिती, संचालक मंडळातील सदस्यांच्यावतीने सादर करताना मला अतिशय आनंद व समाधान होत आहे.

आपण जाणतच आहात की, फेडरेशन ही राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन सर्व प्रकारचे कार्यालयीन कामकाज उत्तमप्रकारे व समाधानकारकपणे करुन आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी करत आलेली आहे.

त्याचप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणपूर्व समिती, स्थायी सल्लागार समिती, टॅफकब समिती इ.च्या माध्यमातून फेडरेशन सभासद नागरी सहकारी बँकांच्या विविध समस्यांचे निवारण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. रिझर्व्ह बँकेचे आर्थिक निकष व त्या राबविण्याच्या बाबी, वैधानिक बंधने, धोरणात्मक समस्या यासंदर्भात तसेच बँकांना दैनंदिन कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत पत्राद्वारे व नागरी बँक वार्तापत्राद्वारे सतत मार्गदर्शन देखील फेडरेशन करीत असते.

त्याचबरोबर केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, सहकार खाते यांच्याकडून जारी केल्या जाणाऱ्या विविध योजनांबाबत तथा कायद्यातील घडामोडी इ.बाबत अद्ययावत माहिती नागरी सहकारी बँकांना उपलब्ध/अवगत करुन देण्याचे कार्य फेडरेशन करीत असते.

**फेडरेशनच्या चालू आर्थिक वर्षातील महत्त्वाच्या घडामोडी**

अहवाल सालातील महत्त्वाच्या या घडामोडींमध्ये फेडरेशनतर्फे खालीलप्रमाणे प्रशिक्षण वर्ग, संवादसत्र इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संक्षिप्त स्वरुपात सादर करण्यात येत आहे.

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशनतर्फे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांकरिता आयोजित केला जाणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' वितरण सोहळा**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशनतर्फे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांकरिता आयोजित केला जाणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' वितरण सोहळा कोरोनाच्या पार्श्वभूमिवर शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात आलेल्या जमावबंदीच्या आदेशामुळे सन २०२०-२१ करिता रद्द करण्यात आला आहे.

★★★★

**प्रशिक्षण कार्यक्रम -**

**वर्षभरात फेडरेशनने सभासद बँकांचे पदाधिकारी, व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते.**



१) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, उप प्रमुख तथा सहाय्यक व्यवस्थापक तथा इतर व्यवस्थापक वर्गासाठी दि. ३०/०५/२०२० रोजी 'Cyber Security' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता.या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेच्या मा. उप महा व्यवस्थापक, श्री. ए. जी. गिरिधरन यांनी Importance of Comprehensive Cyber Security Framework for UCBs on a graded approach या विषयांवर, तसेच डिजिटल बँकिंग आणि सायबर सिक्युरिटी तज्ञ मा. श्री. रविकिरण मंकिकर यांनी Need for Secured Digital Banking and applicability of the RBI's circular to UCBs या विषयांवर, आणि ॲड. जयश्री नांगरे यांनी Cyber Security Awareness and Legal aspects to be checked while drafting SLA with Outsourcing Vendors या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ५८ बँकांचे ११० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

२) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, उपप्रमुख तथा सहाय्यक व्यवस्थापक तथा इतर व्यवस्थापक वर्गासाठी दि. २०/०३/२०२१ रोजी 'Comprehensive Cyber Security Framework & Technology Vision for Cyber Security' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण वर्गामध्ये व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे मा. सहायक महाप्रबंधक, श्री. प्रविण भावसर यांनी Importance of Comprehensive Cyber Security Framework, Cyber Security Controls for Third party ATM Switch Application Service Proviers, Need for Secured Digital Banking and Applicability of RBI's Circular, Regulatory Aspectes of 'Technology Vision for Cyber Security' for UCBs - 2020-23 या विषयांवर, तसेच डिजिटल बँकिंग आणि सायबर



सिक्युरिटी तज्ञ मा. श्री. रविकिरण मंकिकर यांनी Importance of Effective Incident Response Management, Digital Payments Security Controls, Importance of Effective Business Continuity Planning या विषयांवर, आणि ॲड. जयश्री नांगरे यांनी 'Cyber Security Hygiene' Policy and Other Policies, Compliance with Various Standards – PCI-DSS, PA-DSS,ISO-27001:2013, IT Act 2008, RBI, CERT-IN, Virus/Malware Attack, Introduction of Malicious Code or Unauthorized

Access Leading to Data Breach and so on.... या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ३५ बँकांचे ५९ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

वरील सर्व प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित प्रशिक्षणार्थींनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे, समस्यांचे समाधानकारक निवारण मा. व्याख्यात्यांनी केले.


★★★★

## राज्यस्तरीय संवादसत्र

सध्याच्या स्पर्धात्मक व जागतिकीकरणाच्या युगात जास्तीत जास्त नफा हेच उद्दिष्ट असणाऱ्या बँकिंग क्षेत्रात सामाजिक उद्दिष्टे जपणाऱ्या सहकारी बँकिंग क्षेत्राचे भवितव्य अडचणीत आले आहे. अनेकदा या बँकांना प्रसार-माध्यमांद्वारे देण्यात आलेली नकारात्मक प्रसिध्दी, या क्षेत्रात घडलेल्या चुकीच्या गोष्टी, त्यातच रिझर्व्ह बँकेचा या क्षेत्राकडे पहाण्याचा असलेला सावत्रपणाचा दृष्टीकोन यामुळे सहकारी बँकिंग क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील हिस्सा सातत्याने घटत आहे. परिणामी नागरी सहकारी बँकिंग क्षेत्र हे रिझर्व्ह बँकेसह केंद्र व राज्य सरकारला नकोसे झाले आहे, अशी या क्षेत्राची भावना दिवसेंदिवस दृढ होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर समस्त सहकारी बँकिंग क्षेत्राला चैतन्यमय आणि आश्वासक मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याने फेडरेशनतर्फे दि.२८ मे, २०२० रोजी ऑनलाईन पध्दतीने संवादसत्र आयोजित करण्यात आले होते.




या संवादसत्राचे सुत्रधार व फेडरेशनचे अध्यक्ष **मा. श्री. विद्याधर अनास्कर** यांनी नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राशी निगडीत अनेक प्रश्न मा. केंद्रिय मंत्री **श्री. नितीन गडकरीजी** यांचेसमोर उपस्थित केले, ज्यामध्ये प्रामुख्याने पुढील प्रश्नांचा समावेश आहे. उदा. देशाच्या अर्थव्यवस्थेत नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राची उपयुक्तता सिध्द करण्याची संधी सहकारी बँकांना मिळाली पाहिजे; 'सहकार' ही शासन प्रणित चळवळ असताना सहकारी बँकिंग क्षेत्राला केंद्र व शासनाचे पाठबळ मिळत नाही, अनेकदा शासकीय योजनांमध्ये सहकारी बँकांचा समावेश केला जात नाही. अनेक आर्थिक निकषांच्या पातळीवर नागरी सहकारी बँका उत्तमरितीने काम करत असतानादेखील या बँकांमध्ये व्यावसायिकतेचा अभाव असल्याचा आरोप या क्षेत्रावर केला जातो, व त्याकरिता सहकारी बँकांवर व्यवस्थापन मंडळाचे नियंत्रण असण्याचा आग्रह नियामांकडून केला जातो.



सहकारी बँकांनी आपला व्यवसाय मर्यादित ठेवणे, व्यवसायात वाढ झाल्यास आपले रुपांतर या बँकांनी व्यापारी बँकेत करणे, समान संधीची भाषा करत असतानाच रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांची कर्जाची कमाल मर्यादा कमी करुन अग्रक्रम क्षेत्रातील टक्केवारीत मात्र या बँकांकरिता मोठया प्रमाणात वाढ करणे. सन २००२ पासून एकाही नवीन सहकारी बँकेला परवाना न देणे. पूर्वीच्या लहान परंतु

अनेक बँका या धोरणाऐवजी मोठया परंतु मोजक्याच बँका असे धोरण रिझर्व्ह बँकेने अवलंबलेले आहे. आणि त्याकरिता रिझर्व्ह बँक आपले निकष/नियम दिवसेंदिवस या बँकांप्रती कडक करत चालली आहे. या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेऐवजी 'नाबार्ड' सारख्या सहकार जाणणाऱ्या त्रयस्थ संस्थेकडे सहकारी बँकांचे नियंत्रण जाणे जरुरीचे आहे, असे मत याप्रसंगी मा. अध्यक्षांनी व्यक्त केले.

वरीलप्रमाणे मा. अध्यक्षांनी सादर केलेल्या अनेक प्रश्नांना मा. केंद्रिय मंत्री **श्री. नितीन गडकरीजी** यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. आपल्या भाषणात श्री. गडकरीजी म्हणाले की, सहकार व खाजगीकरण या दोहोंमधील चांगल्या तत्वांचा अंगिकार सहकारी बँकांनी करावा, राज्याच्या सहकार कायद्यात योग्य तो बदल/सुधारणा त्याकरिता झाल्या पाहिजेत.बँकिंग कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणात सहकारा बँकांनी केला पाहिजे. MSMEs, Agro Processing इ. क्रियाप्रकल्पात केंद्र सरकारकडून जारी करण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये, व्याजाच्या अनुदानामध्ये सहकारी बँकांचा देखील समावेश करुन देण्याचे आश्वासन मा. केंद्रिय मंत्री **श्री. नितीन गडकरीजी** यांनी या चर्चेदरम्यान सहकारी बँकिंग क्षेत्राला दिले.



फेसबुक, यु-टयुब व गुगलच्या माध्यमातून सुमारे ७५० हून अधिक बँकर्स, संचालक, तज्ञ इ. या संवादसत्रात सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी या परिषदेस मा.सन्माननीय अतिथी, विशेष आमंत्रित, सहकार क्षेत्रातील इतर मान्यवर व तज्ञ मंडळी तसेच समस्त नागरी सहकारी बँकांचे व जिल्हा/विभागीय बँक्स् असोसिएशन्स्चे मा. पदाधिकारी व संचालक आवर्जून उपस्थित राहील्याबद्दल फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर** यांनी त्यांचेप्रति आभार व्यक्त केले.

★★★★

**टॅफकॅब**

भारतीय रिझर्व्ह बँकेने महाराष्ट्रासाठी निर्माण केलेल्या स्टेट लेवल टास्कफोर्सच्या मुंबई विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे विद्यमान अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर**, तर नागपूर विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे विद्यमान संचालक **मा.श्री.सतिश गुप्ता** तसेच बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी असलेल्या टॅफकबच्या सभांसाठी फेडरेशनचे विद्यमान संचालक **मा.श्री. सि.बा.आडसूळ** हे उपस्थित राहून नागरी सहकारी बँकांना न्याय मिळवून देण्याकरिता प्रयत्नशील असतात. त्याकरिता टॅफकबवरील बँकांची पूर्वसभा बोलावून बँकांच्या समस्या जाणून घेऊन त्या टॅफकब समितीसमोर फेडरेशनच्या संचालकांमार्फत मांडल्या जातात. अशा वेळी या बँकांना त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता अथवा या बँकांच्या विनंतीवरुन विलीनीकरणाकरिता मोलाचे मार्गदर्शन देखील वेळोवेळी फेडरेशनतर्फे केले जाते.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागातर्फे १ सभा, नागपूर विभागातर्फे ३ सभा, तथा केंद्रीय विभागातर्फे बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी १ सभा घेण्यात आली.

★★★★

**सभासदत्व**

अहवाल सालात सी. के. पी. को-ऑप. बँकेचा परवाना रद्द करण्यात आल्याने, तसेच नीड्स ऑफ लाईफ को-ऑप. बँकेचे दि सुटेक्स को-ऑप. बँक, सुरत या बँकेत विलीनीकरण झाल्याने दिनांक ३१ मार्च,२०२१ अखेर ४८० नागरी सहकारी बँका, १ सहयोगी सभासद व १८ नागरी सहकारी बँकांची विभागीय/जिल्हा असोसिएशन्स मिळून फेडरेशनची एकूण सभासद संख्या ४९९ झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील ज्या नागरी सहकारी बँका अद्याप फेडरेशनच्या सभासद झालेल्या नाहीत त्यांना फेडरेशनचे सभासद होण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात येत आहे.

★★★★

**राष्ट्रीय पातळीवरील संस्था**

सभासद बँकाना मार्गदर्शन करत असताना आपली फेडरेशन, राष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी सलोख्याचे संबंध ठेवून आहे. सहकार, बँकिंग व व्यापार उदीम क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील खालील संस्थांची फेडरेशन सभासद आहे.

- नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडिया, नवी दिल्ली.
- नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप.बँक्स ॲण्ड क्रेडीट सोसायटीज लि., नवी दिल्ली.
- इंडियन मर्चन्टस चेंबर, मुंबई.
- इंडियन बँक्स् असोसिएशन, मुंबई.
- इंडियन इन्स्टिटयुट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनॅन्स्, मुंबई.

वरील मान्यवर संस्थांकडून आलेली माहिती फेडरेशनच्या सर्व सभासद बँकांना वेळोवेळी वितरीत केली जाते.

★★★★

**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

फेडरेशन MBA आणि Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा बँकिंग आणि सहकार विषयक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यास सर्वतोपरी मदत करीत असते. राज्याच्या विविध भागातून, जिल्ह्यांमधून भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक बाबी, सहकारी बँकांचा इतिहास आणि अलीकडील बँकिंग क्षेत्रातील घडामोडी इ. बाबत माहिती जाणून घेण्यासाठी अनेक विद्यार्थी फेडरेशनशी संपर्क साधत असतात किंवा कार्यालयास भेटी देत असतात.

★★★★

**नागरी बँक वार्तापत्र**

महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकांसाठीचे एकमेव **'नागरी बँक वार्तापत्र'** हे त्रैमासिक गेल्या तीन दशकांपेक्षा अधिक काळाहून सभासद नागरी सहकारी बँकांना/असोसिएशन्स् यांना विनामुल्य फेडरेशनतर्फे पाठविण्यात येत असते. या त्रैमासिक वार्तापत्रात भारतीय रिझर्व्ह बँकेची परिपत्रके, सहकार खात्याची परिपत्रके, महाराष्ट्र शासनाचे अध्यादेश, शासन निर्णय, भारत सरकारची राजपत्रके,

नागरी सहकारी बँकांना येणाऱ्या अडचणींचे न्याय-निवाडयासंदर्भातील किस्से, सभासद बँकांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उच्च पातळीवरील मान्यवरांच्या भेटीचा वृत्तांत, भारतीय रिझर्व्ह बँकेशी होणाऱ्या स्थायी सल्लागार समितीच्या सभांचा आढावा, टॅफकबमधील सभासद बँकांनी घ्यावयाची दक्षता व मार्गदर्शन, सभासद बँकांनी केलेल्या कामगिरीचा गौरव वृत्तांत, सहकारी बँकांतील मान्यवरांचा अभिनंदनपर उल्लेख व सध्याच्या बँकिंग क्षेत्रातील घडामोडीबाबतची अद्ययावत माहिती आवर्जून या वार्तापत्रात प्रसिध्द करण्यात येत असते.

★★★★

## आर्थिक प्रगतीचा आलेख

अहवाल वर्षातील ठळक घडामोडीवरुन आपल्या निदर्शनास आले असेलच की, नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीकरिता फेडरेशन सदैव सक्रिय राहीलेली आहे आणि म्हणूनच ती खऱ्या अर्थाने नागरी सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था म्हणून गणली जाते. गेल्या वर्षभरात ई-मेलच्या माध्यमातून तथा लेखी पत्रांद्वारे नागरी सहकारी बँकांनी त्यांच्या समस्या, अडचणी प्रश्नरुपाने फेडरेशनला सादर केल्या व त्याची त्वरीत दखल घेऊन फेडरेशनही त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तत्पर राहीली आहे.

फेडरेशनच्या या आर्थिक वर्षातील कामगिरीनंतर मी वाढावा विभागणी तसेच फेडरेशनने केलेल्या आर्थिक प्रगतीचा मुद्देसूद तपशील आपणांसमोर सादर करीत आहे.

## वाढावा विभागणी

दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर फेडरेशला प्राप्त झालेल्या उत्पन्नातून खर्च व तरतुदी वजा जाता शिल्लक राहिलेला वाढावा व त्यात गतवर्षीचा उरलेला वाढावा मिळविता एकूण रु.८,०१,२३२.१० पैसे फक्त वाढाव्याच्या स्वरुपात शिल्लक राहिले आहेत. सदर वाढाव्याची खालीलप्रमाणे विभागणी करण्यात आली असून त्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. तरी सदर वाढावा विभागणीस अंतिम मंजूरी देण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी २५% | रु. | २,०१,०००.०० |
| इमारत आणि विकास निधी | रु. | २,००,०००.०० |
| अनपेक्षित देणी निधी | रु. | १,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | रु. | १,००,०००.०० |
| रजा रोखीकरण निधी | रु. | २,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | रु. | २३२.१० |
| एकूण | रु. | ८,०१,२३२.१० |

★★★★

## हिशेब पत्रके

सन २०२०-२१ या आर्थिक सालासाठी फेडरेशनच्या जिंदगी व देयता तसेच उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

**जिंदगी व देयता:** (रु. लाखात)

| **जिंदगी** | **३१/०३/२०२०** | **३१/०३/२०२१** |
|---|---|---|
| रोख व बँकांमधील शिल्लक | ७८.७७ | १३.९३ |
| गुंतवणूक | ५२८.८५ | ६४९.७९ |
| फिक्सड ॲसेटस् | १६.६३ | १५.५० |
| प्रिमीअम ऑन लिज्ड् प्रिमायसेस | ३०.०० | ३०.०० |
| संकीर्ण येणी | ८१.८८ | १०९.४१ |
| **एकूण** | **७३६.१३** | **८१८.६३** |

| **देयता** | **३१/०३/२०२०** | **३१/०३/२०२१** |
|---|---|---|
| राखीव निधी | ९२.५२ | ९४.५२ |
| इमारत आणि विकास निधी | ३०३.६० | ३११.६० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी फंड | ८१.६३ | ८९.१३ |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | ४२.५१ | ४९.८४ |
| अमोरटायझेशन निधी | १४.२५ | १४.७५ |
| अनपेक्षित देणी निधी | ५५.०० | ६१.३७ |
| कर्मचारी कल्याण खर्च | ३०.४४ | ३६.४४ |
| निवडणूक निधी | - | ३.८२ |
| गुंतवणूकीकरिता खास निधी | १६.०० | ३२.०० |
| बृहन्मुंबई ना.सह.बँक्स् असो. कडून मिळालेले प्रिमियम | ७.४५ | ७.४५ |
| चालू देणी व तरतुदी | ८४.७३ | १०९.७० |
| एकूण वाढावा | **८.००** | **८.०१** |
| **एकूण** | **७३६.१३** | **८१८.६३** |

**उत्पन्न व खर्च** (रु. लाखात)

| **उत्पन्न** | **३१/०३/२०२०** | **३१/०३/२०२१** |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | १०३.५६ | ९८.५० |
| गुंतवणूकीवर व इतर बाबींवर मिळालेले व्याज | ४५.१२ | ३५.९५ |
| इतर उत्पन्न | ४४.८४ | २.२६ |
| **एकूण** | **१९३.५२** | **१३६.७१** |

| **खर्च** | ३१/०३/२०२० | ३१/०३/२०२१ |
|---|---|---|
| प्रशासकीय खर्च | ५३.८८ | ५१.५४ |
| कार्यालयीन खर्च | ९.४५ | ३.१४ |
| फी, कमिशन | २.४१ | १.७६ |
| घसारा | २.३५ | २.११ |
| मालमत्ता खर्च (भाडे, कर, विमा इ.) | ५.७३ | ५.३१ |
| इतर खर्च | २५.७० | १४.७७ |
| विविध निधींमध्ये वर्ग | ८६.०० | ५०.०७ |
| खर्च वजा जाता वाढावा | ८.०० | ८.०१ |
| **एकूण** | **१९३.५२** | **१३६.७१** |

**उत्पन्न, खर्च व वाढाव्याचा तुलनात्मक तपशील** **(रु.लाखात)**

| **तपशील** | **३१/०३/२०१८ अखेर** | **३१/०३/२०१९ अखेर** | **३१/०३/२०२० अखेर** | **३१/०३/२०२१ अखेर** |
|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | १६८.६० | १५५.३६ | १९३.५२ | १३६.७१ |
| **खर्च** | १६१.९७ | १४८.०० | १८५.५२ | १२८.७० |
| **वाढावा** | ६.६३ | ७.३६ | ८.०० | ८.०१ |

सभासद बँकांकडून वसूल करण्यात आलेली थकीत वार्षिक वर्गणी, फेडरेशनने विविध बँकांमधील ठेवींमध्ये केलेली गुंतवणूक, प्रशिक्षण व अनुदानाद्वारे मिळालेल्या निधीमुळे व त्याचबरोबर प्रशासकीय खर्चात केलेल्या काटकसरीमुळे फेडरेशनला दि.३१ मार्च, २०२१ अखेर एकूण रु.१३६.७१ लाखाचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. सदर उत्पन्नातून इतर खर्च व तरतूदी वजा जाता फेडरेशनला ५८.०८ लाखांचा वाढावा प्राप्त झालेला आहे. फेडरेशनला प्राप्त झालेल्या एकूण वाढाव्यातून सुमारे ५०.०७ लाखाची रक्कम विविध निधींमध्ये वर्ग करण्यात येऊन निव्वळ वाढावा रु.८.०१ लाख इतका शिल्लक राहिलेला आहे. फेडरेशनची गुंतवणूक व ठेवींची रक्कम रु.५२८.८५ लाखावरुन ६४९.७९ लाख झाली आहे. तसेच राखीव तथा इतर निधींमध्ये ९% हून अधिक वाढ झालेली असून मार्च, २०२१ अखेर राखीव व इतर निधी सुमारे रु.६९३.४७ लाख आहे.

★★★★

## संचालक मंडळ सभा

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ६ सभा व उपसमितीची १ सभा घेण्यात आली. सदर सभांमध्ये नागरी सहकारी बँकांच्या विविध प्रश्नांसंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. मा.संचालकांनी आपले यथोचित योगदान या सभांद्वारे प्रदान केले.

★★★★

## लेखापरिक्षण

फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी **मेसर्स एस. डी. साटम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांची **'अंतर्गत लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि.१५/०६/२०२१ रोजी अंतर्गत लेखापरिक्षण करुन आपला अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

तसेच वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी शासन मान्यताप्राप्त पॅनेलवरील 'अ' गटातील **मेसर्स संजय राणे ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांची **'वैधानिक लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी दि.२८/०७/२०२१ रोजी आपला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

मा.वैधानिक लेखापरिक्षक **मेसर्स संजय राणे ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांनी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी फेडरेशनला लेखापरिक्षण वर्ग **'अ'** दिलेला आहे. त्यांनी फेडरेशनच्या कामकाजामध्ये लेखापरिक्षणाच्या आधारे बहुमोल मार्गदर्शन करुन फेडरेशनच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्याबद्दल फेडरेशनतर्फे त्यांचे व त्यांच्या सहकारी वर्गाचे मन:पूर्वक आभार.

★★★★

## कर्मचारी वर्ग

फेडरेशनच्या सेवेत एक हिशेबनीस, एक लिपीक, एक रिसेप्शनीस्ट, दोन शिपाई व एक ड्रायव्हर इतका कर्मचारी वर्ग असून **मा.सौ.सायली भोईर** या फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव म्हणून काम पाहतात.

★★★★

## अभिनंदन

❖ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५४ (अ) (१) मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन दि. ६ ऑगस्ट, २०२१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सहकार परिषदेवर (महाराष्ट्र स्टेट को- ऑप. कौन्सिल) नव्याने दि महाराष्ट्र राज्य अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर** यांची **अध्यक्षपदी** नेमणूक करण्यात आली आहे.

**फेडरेशनच्या परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन!**

★★★★

## भावपूर्ण श्रद्धांजली

अहवाल सालात खालील मान्यवर, प्रतिष्ठित व्यक्तिंना देवाज्ञा झाली. त्यांना फेडरेशनच्या परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

❖ पद्मविभूषण तसेच भारतरत्न पुरस्कार विजेते देशाचे माजी राष्ट्रपती **प्रणव मुखर्जी** यांचे निधन झाले.

- ❖ महाराष्ट्राचे दहावे माजी मुख्यमंत्री **शिवाजीराव निलंगेकर पाटील** यांचे निधन झाले.
- ❖ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते **अहमद पटेल** यांचे निधन झाले.
- ❖ भारतातील हिंदी भाषक राजकारणी तसेच लोक जनशक्ती पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष **रामविलास पासवान** यांचे निधन झाले.
- ❖ भारताचे माजी लष्करप्रमुख **जोगिंदर जसवंत सिंग** यांचे निधन झाले.
- ❖ वायुसेनेचे माजी पायलट **कॅप्टन दीपक साठे** यांचे निधन झाले.
- ❖ प्रख्यात भारतीय पर्यावरणवादी तथा चिपको आंदोलनाचे प्रणेते **सुंदरलाल बहुगुणा** यांचे निधन झाले.
- ❖ भारतीय शास्त्रीय संगीतातले मेवाती घराण्याचे गायक, तसेच केंद्रशासनाने संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल इ.स.२००० साली पद्मविभूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आलेले **पंडित जसराज** यांचे निधन झाले.
- ❖ पद्मविभूषण पंडित राजन मिश्रा यांचे निधन झाले.
- ❖ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे विद्यमान ज्येष्ठ संचालक व माजी अध्यक्ष **बाळासाहेब उर्फ दामोदर कृष्णाजी माजगांवकार** यांचे निधन झाले.
- ❖ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे माजी संचालक **वसंत मेहेंदळे, माधवराव पाटील** आणि **सुभाष राठी** यांचे निधन झाले.
- ❖ एस.टी.महामंडळाचे माजी अध्यक्ष आणि पंढरपूरचे आधारवड **सुधाकरपंत परिचारक** यांचे निधन झाले.
- ❖ आयुर्वेद आणि योगशिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे व्रत घेतलेले **श्रीगुरु बालाजी तांबे** यांचे निधन झाले.
- ❖ भारतीय धावपटू **मिल्खा सिंग** यांचे निधन झाले.
- ❖ हिंदी चित्रपटसृष्टीत ट्रॅजेडी किंग म्हणून ओळखले जाणारे अभिनेते **दिलीप कुमार** यांचे निधन झाले.
- ❖ हिंदी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शिका **सरोज खान** यांचे निधन झाले.
- ❖ बॉलिवूडचे सदाबहार, बहुआयामी, प्रसन्न प्रतिभावंत दिग्गज अभिनेते **ऋषी कपूर, इरफान खान, सुशांत सिंह राजपूत** यांचे निधन झाले.
- ❖ हिंदी चित्रपटसृष्टीचे दिग्दर्शक आणि पटकथा लेखक **बासू चटर्जी** यांचे निधन झाले.
- ❖ प्रेमळ व्यक्तिमत्व व कसदार अभिनयाने रंगभूमी, विविध मालिका, मराठी तसेच हिंदी सिनेसृष्टीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री **आशालता वाबगांवकर** यांचे निधन झाले.
- ❖ प्रख्यात मराठी लेखिका आणि आचार्य अत्रे उर्फ प्र. के. अत्रे यांच्या कन्या **मीना देशपांडे** यांचे निधन झाले.

याशिवाय देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान, थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रीडा इ.क्षेत्रातील ख्यातीप्राप्त व लोकप्रिय व्यक्ती तसेच मार्च २०२१ पासून संपूर्ण जगात थैमान घातलेल्या कोविड-१९ या साथीच्या रोगामुळे व नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन पावलेल्या इतर ज्ञात-अज्ञात निरपराध दिवंगत व्यक्तींना फेडरेशनतर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

★★★★

**आभार व ऋणनिर्देश**

अहवालसाली खालील व्यक्तींनी/संस्थांनी फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजात मोलाचे सहाय्य व मार्गदर्शन केले.

राज्याचे मुख्यमंत्री **मा.श्री.उद्धव ठाकरे**, उपमुख्यमंत्री **मा.श्री.अजितदादा पवार**, महसूलमंत्री **मा.श्री.बाळासाहेब थोरात**, सहकारमंत्री **मा.श्री. बाळासाहेब पाटील**, सहकार राज्यमंत्री **मा.श्री. विश्वजीत कदम**, माजी केंद्रीय कृषी मंत्री व खासदार **मा.श्री.शरदचंद्रजी पवार**, सहकार विभागाचे प्रधान सचिव **मा.श्री. अनुप कुमार**, सहकार आयुक्त **मा.श्री.अनिल कवडे**, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्त **मा.डॉ.जगदीश पाटील**, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर **मा. श्री. शक्तिकांत दास**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग रेग्युलेशन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री. एम.राजेश्वर राव**, कार्यकारी संचालक **मा.श्री. जे. के. दास**, मुख्य सरव्यवस्थापक **मा.श्री.निरज निगम**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग सुपरव्हिजन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री.एम.के.जैन**, कार्यकारी संचालक **मा.श्री.एस. सी. मुरमु**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ सुपरव्हिजनच्या केंद्रिय विभागाच्या मुख्य सरव्यवस्थापिका (शेडयुल बँक) **मा. श्रीमती उमा शंकर**, तसेच मुख्य सरव्यवस्थापक (नॉन शेडयुल बँक) **मा. श्री. भार्गेश्वर बॅनर्जी**, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कृषी बँकिंग कॉलेजचे प्रिन्सीपाल **मा.श्री. व्ही. जी. सेकर**, इंडियन बँक्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी, **मा.श्री. सुनिल मेहता**, नॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री.ज्योतिंद्र मेहता**, उपाध्यक्ष **मा. श्री.विद्याधर अनास्कर**, नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडियाचे अध्यक्ष **मा.श्री. दिलीप संघानी**, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक **मा.डॉ.अजित देशमुख**, उपनिबंधक (अर्बन बँका) **मा.डॉ.आनंद कटके**, फेडरेशनचे वैधानिक लेखापरिक्षक **मे. संजय राणे ॲण्ड असोसिएटस्**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई व अंतर्गत लेखापरिक्षक **मे.एस.डी.साटम ॲण्ड कंपनी**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई, तसेच फेडरेशनच्या यशस्वी वाटचालीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती, जिल्हा व विभागीय असोसिएशन्स, फेडरेशनच्या विविध उपक्रमास लोकाभिमुख करणारी प्रसिध्दी माध्यमे आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे मी याप्रसंगी आभार मानतो.

फेडरेशनच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत असताना, सभासद नागरी सहकारी बँका/ जिल्हा-विभागीय असोसिएशन्सच्या पदाधिकाऱ्यांनी फेडरेशनला दिलेला सक्रिय पाठिंबा, सहकार्य तसेच फेडरेशनचे कामकाज करताना केलेल्या सूचना फेडरेशनला मार्गदर्शक ठरल्या आहेत. फेडरेशनची

उद्दिष्टे नजरेसमोर ठेऊन सभासद बँकांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी तसेच माझ्या सहकाऱ्यांनी सातत्याने केला आहे, त्याचे फलित म्हणूनच आपल्या सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. ही जबाबदारी पेलताना प्रत्येक संचालकांनी दिलेल्या सहकार्याबरोबर विद्यमान उपाध्यक्ष **मा.श्री रमाकांत खेतान** यांनी दिलेली मोलाची साथ तसेच मुख्य कार्यकारी व सचिव **सौ.सायली भोईर** व **सेवक वर्ग** या सर्वांनी फेडरेशनचे कामकाज करण्यामध्ये मला उत्तम सहकार्य केले आहे, त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. आजवरचा हा विश्वास, जिव्हाळा, प्रेम व सहकार्य असेच कायम राहो ह्याच अपेक्षांसह फेडरेशनच्या सेवेसाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन पुनश्च देवून मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभासद बंधू-भगिनींनो, सन २०२०-२१ च्या अहवालासंबंधातील माहितीचे विवेचन मी आतापर्यंत आपणांस या भाषणाच्या निमित्ताने सादर केले आहे. यानंतर विषय सूचीप्रमाणे दि. ३१ मार्च,२०२१ रोजीचे ताळेबंद पत्रक व आयव्यय पत्रक, आगामी वर्षाचे अंदाज पत्रक इत्यादींचा तपशील या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आला आहे. आपणाकडे सादर केलेला अहवाल, आय-व्यय पत्रक, ताळेबंद पत्रक, वाढावा विभागणी आणि अंदाज पत्रक आपण स्वीकृत करावे तसेच फेडरेशनच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आपण सर्वांनी सहकार्याचा हातभार लावावा ही नम्र विनंती.

जय हिंद । जय महाराष्ट्र । जय सहकार ।

**विद्याधर अनास्कर**
अध्यक्ष

★★★★

## दिनांक २४ मार्च,२०२१ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची **४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २४ मार्च, २०२१ रोजी दुपारी २:००** वाजता 'भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१' येथे संपन्न झाली. सदर सभेस खालील सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्चे प्रतिनिधी उपस्थित होते.

| **प्रतिनिधींचे नाव** | **बँकेचे / असोसिएशन्स्चे नाव** |
|---|---|
| मा.श्री. विद्याधर अनास्कर (ऑनलाईन) | विद्या सहकारी बँक लि.पुणे |
| मा.श्री. रमाकांत खेतान (ऑनलाईन) | दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप.बँक लि.अकोला |
| मा.श्री. आनंदराव अडसूळ | सिटी को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.संदिप घनदाट | अभ्युदय को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.ज्ञानेश्वर वांगडे | दि सातारा सहकारी बँक लि.मुंबई |
| मा.श्री.भास्करराव कोठावदे | दि ओझर मर्चन्टस् को-ऑप.बँक लि.ओझर |
| मा.श्री. अजय ब्रम्हेचा | दि लासलगांव मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., लासलगांव |
| मा.श्री. अुत्तम जोशी | ठाणे भारत सहकारी बँक लि.,ठाणे |
| मा.श्री. सुनिल देवडा (ऑनलाईन) | ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि., हिंगोली |
| मा.श्री. सतीश गुप्ता | दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि.,चिखली |
| मा.श्रीमती शोभाताई सावंत | दि अण्णासाहेब सावंत अर्बन को-ऑप.बँक महाड लि.,महाड |
| मा.डॉ. शशीताई अहिरे | दि नाशिक जिल्हा महिला सहकारी बँक लि.,नाशिक |
| मा.श्री. अशोक शेळके | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि., निघोज |
| मा.श्री. प्रकाश गवळी (ऑनलाईन) | जनता सहकारी बँक लि., सातारा |
| मा.श्री. सि.बा.आडसूळ | दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असो.लि., मुंबई |
| मा.श्री. संजय भेंडे | नागपूर नागरिक सहकारी बँक लि.,नागपूर |
| मा.सौ. सायली भोईर | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई |
| मा.सौ. शाहिन मोमीन | नागरीक सहकारी बँक लि., भिवंडी |
| मा.श्री. असद फकी | -//- |
| मा.श्री. महावीर बनगर | दि. म्युनिसिपल को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री. वर्षा माळी | -//- |
| मा.श्री. विष्णू घुमरे | -//- |
| मा.श्री. मुकेश घुमरे | -//- |
| मा.श्री. संजय जाधव | -//- |
| मा.श्री. अभिजीत बागुल | -//- |
| मा.श्री. संजय कदम | महाराष्ट्र मंत्रालय अॅण्ड अलाइड ऑफिसेस को-ऑप बँक लि., मुंबई |
| मा.श्री. शिवाजी लोंढे | शरद सहकारी बँक लि., मंचर |
| मा.सौ. सोनाली कदम | दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असो.लि., मुंबई |

| | |
|---|---|
| मा.श्री. एस.एस.दुर्वे | दि सातारा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री. काशिनाथ मोरे | दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री. सुभाष देशमुख | दि साहेबराव देशमुख को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री. कृष्णा मासाळ | -//- |
| मा.श्री. मधुकर मोरे | -//- |
| मा.श्री. दत्ताराम चाळके | अपना सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री. संतोश सावंत | कल्लापन्ना आवडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी |
| मा.श्री. वी.डी चिविलकर | दि कुणबी सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री. जयवंत पाटील | वैश्य सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री. विश्राम दिक्षीत | दि कॉसमॉस को-ऑप बँक लि., पुणे |
| मा.श्री. मुकुंद कळमकर (ऑनलाईन) | सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप. बँक लि., परभणी |
| मा.श्री. जयंत देशपांडे (ऑनलाईन) | दि बाबासाहेब देशमुख सहकारी बँक लि., सांगली |
| मा.श्री. अशोक पाटील (ऑनलाईन) | आदरणीय पी डी पाटील साहेब सहकारी बँक लि., सातारा |
| मा.श्री. गणेश गाडगीळ (ऑनलाईन) | सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली |

फेडरेशनची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सुरु होण्यापूर्वी फेडरेशनचे संचालक मा. श्री. अुत्तम जोशी यांनी अहवाल सालात देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान, पंचतत्वात विलीन झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. क्षेत्रातील ख्यातीप्राप्त व लोकप्रिय व्यक्ती त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन पावलेल्या इतर ज्ञात-अज्ञात व्यक्ती यांना श्रद्धांजली अर्पण केली.

तद्नंतर फेडरेशनचे अध्यक्ष मा. श्री. विद्याधर अनास्कर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा-विभागीय असोसिएशन्सचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व पदाधिकारी आणि इतर मान्यवरांचे मन:पूर्वक स्वागत केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षीय भाषणात मा. श्री विद्याधर अनास्कर उपस्थित सभासद प्रतिनिधींना संबोधित करताना म्हणाले की, आज सहकारात वार्षिक सर्वसाधारण सभेस अनन्यसाधारण महत्व आहे. कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर इतिहासात पहिल्यांदाच फेडरेशन ऑनलाईन पद्धतीने वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करत आहे. या सभेत सहकारी बँकांशी संबंधित काही मुलभूत प्रश्न उपस्थित करताना मा. अध्यक्ष पुढे असेही म्हणाले की, सध्या सामान्यांच्या विकासासाठी सहकारी बँकांची खरचं गरज आहे का ? ही गरज भागवण्याची क्षमता टिकवायची असेल, ती वाढवायची असेल तर सहकारी बँकांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करावयास नकोत का ? त्यासाठी सहकारातील सर्वांनी एकत्र यावयास नको का ? या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध सहकारातील प्रत्येकाने घेतला पाहीजे.

सहकारात राजकीय जोडे बाहेर ठेवून येण्याचे तत्वज्ञान आपण मान्य करतो, परंतु कृती मात्र या तत्वज्ञानाच्या संपूर्ण विरोधी करतो. पक्षिय व वैचारिक समानतेच्या नावाखाली होणारी विचारांची मुस्कटदाबी थांबली पाहिजे. या विवाद्य अवस्थेतून 'सहकार' हा विचार बाहेर पडला पाहिजे. मात्र सहकाराच्या संवर्धनासाठी आपल्या मनातील विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य या गटबाजीमुळे अनेकदा

सदस्यांना मिळत नाही. नेमक्या याच विसंवादाचा फायदा आपल्या नियामकांकडून घेतला जातो. या अशुध्द व अवघड परिस्थितीतून बाहेर पडून सर्व प्रकारचा विपर्यास टाळून सहकाराचे संजिवक सामर्थ्य आदर्श सहकाराच्या उभारणीसाठी उपयोगी पडावे, अशी भावना त्यामुळेच दृढ होत जाते. यासाठी राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व संस्थांची विचार विनिमयासाठी एक शिखर संस्था असावी. त्या संस्थेला अध्यक्षपद नसावे. त्या शिखर संस्थेत प्रत्येक सहकारी संस्थेने आपल्या एका सदस्याची नियुक्ती करावी. नागरी सहकारी बँकांच्या प्रत्येक धोरणावर त्यामध्ये चर्चा घडवून आणून त्यातील निर्णयानुसार सर्वांचा सुर एकच असावा. आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून केवळ सहकाराच्या संवर्धनासाठी चर्चा करणे आवश्यक आहे. 'आपण करतो तेच कार्यश्रेष्ठ, आपला विचार हाच योग्य', ही भावना त्याजली पाहिजे. राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रावर 'कोणत्या पक्षाचे/विचारांचे वर्चस्व' हा विचार करुन आपण जर या क्षेत्रात कार्यरत राहणार असू, तर या क्षेत्राच्या ऱ्हासाला आपणच केवळ जबाबदार राहू. 'या क्षेत्रामध्ये फक्त सक्षम बँकांचे अस्तित्व ठेवणे, म्हणजे हे क्षेत्र सुदृढ बनविणे', या रिझर्व्ह बँकेच्या धोरणाविरुद्ध आपण सर्वांनी एकत्रितपणे लढा दिला पाहिजे. तसेच सहकारात काम करणाऱ्यांनी आपली जात सहकार, आपला धर्म सहकार आणि राजकीय पक्ष देखील सहकारच असावा, हाच मुलमंत्र ठेवणे गरजेचे आहे.

सध्याच्या परिस्थितीत स्वराज्याकडून सुराज्याकडे जाण्यासाठी इतर अनेक मार्गांपैकी सहकाराचा मार्ग देखील तितकाच महत्वाचा आहे, हे पटवून देताना राजकारण आणि सहकार यांची शुद्धता सांभाळण्याचे आवाहन या निमित्ताने मा. अध्यक्षांनी उपस्थित सर्व सभासदांना केले व सर्व प्रकारचा विपर्यास टाळून सहकाराचे संजीवक सामर्थ्य आदर्श नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या उभारणीसाठी उपयोगी पडावे अशी विनंती आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतेवेळी त्यांनी केली.

वरीलप्रमाणे आपले विचार अध्यक्षीय भाषणात वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींसमोर मांडून मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयांवर कामकाज सुरु करण्यास फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव यांना सूचना केली असता सभेसमोर विषय पत्रिकेवरील खालील विषयांचे वाचन करण्यात आले.

**विषय क्र.१ : ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.**

फेडरेशनच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून नागरी सहकारी बँकांचे/जिल्हा-विभागीय असोसिएशन्स्चे सुमारे ३४ प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित होते, तर ऑनलाईन पद्धतीने व्हिडिओ कॉन्फरन्सींग/ऑडिओ व्हिज्युअलद्वारे ९ प्रतिनिधी उपस्थित होते. सदर सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याची विनंती सभेस केली असता सर्वानुमते खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.१ :** ठराव करण्यात येतो की, फेडरेशनच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यात येत आहे.

सुचक:मा. श्रीमती शोभाताई सावंत
अनुमोदक : मा.डॉ. शशीताई अहिरे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२ : दिनांक २४ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

